## दिनांक: ४ - ४ - २३

## विषय: पुनर्निर्माण प्रकल्पासाठी सात मधून तीन विकसकांची निवड आणि आत्ता पर्यंत झालेल्या कामाचा मागोवा घेण्यासाठी झालेला सभासदांचा मेळावा.

संस्थे च्या पुनर्निर्माण प्रकल्पाअंतर्गत ७ वरून ३ विकसकांची निवड आणि पुढील वाटचाली ची माहिती सर्व सोसायटी सभासद आणि त्यांच्या कुटुंबियांना द्यावी ह्या हेतू ने एक मेळावा दिनांक ३ - ४ - २३ रोजी संध्याकाळी संस्थे च्या मधुकर जोशी सभागृहात आयोजित केला होता. ह्यात एकूण १०७ सभासद् आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

मेळाव्या ची अध्यक्षता श्री विजय सावंत यांनी केली. त्यांनी प्रास्ताविक केल्या नंतर आपले प्रकल्प सल्लागार श्री हर्षल कवडिकर आणि विधी सल्लागार एड. किरण काबरा ह्यांनी PPT सादरीकरण करून १९ वरून १०, मग १० वरून ७ आणि आता ७ वरून ३ विकसकांची निवड कशी करण्यात आली, ह्या प्रक्रिये साठी कुठले निकष लावण्यात आले, प्रत्येक विकसकाचे, त्याच्या सोबत असलेल्या इतर पार्टनर्स ची आर्थिक बाजू, ह्या कामात असलेला त्यांचा अनुभव, त्यांनी पूर्ण केलेले अगर करीत असलेले प्रकल्प, त्याची ब्रँड वेल्यू, मार्केट मधे असलेली त्याची पत सारख्या बऱ्याच बाबींचा सखोल अभ्यास करून ही निवड झाल्या चे विषद केले.

ह्या संबंधात दोन्ही सल्लागार आणि आपली पंच समिती ह्यांची जी मीटिंग २४ मार्च, २३ रोजी झाली होती तेच सगळे सादरीकरण सर्व सभासदां समोर ही करावे असे २४ तारखेलाच ठरविण्यात आले होते. त्या प्रमाणे काल चा मेळावा आणि सादरीकरण करण्यात आले. २४ तारखे च्या सादरीकरणा ची माहिती आपल्या वेब साइट वर दिली आहे म्हणून इथे परत त्याची सविस्तर माहिती देत नाही.

ह्या प्रकल्पाच्या पुढील वाटचाली संबंधी सल्लागार आणि पंच समिती तर्फे असे सांगण्यात आले कि पंच समिती सदस्य संस्थे च्या प्रत्येक सभासदाला भेटून नवीन घरा सम्बन्धी त्यांची काय मागणी असेल त्याची नोंद घेतील. त्यानंतर ही माहिती कंपाइल करून सल्लागारांन मार्फत निवडलेल्या तिन्ही बिल्डर्स ला देतील ज्या वरून त्यांना नवीन इमारतींचे डिजाइन करायला सोपे जाईल.

ह्याच काळा मधे दुसरीकडे आपल्या सोसायटी च्या ब वर्गातून अ वर्गात वर्गिकरण्याला पण पूर्णत्वास नेण्यात येईल.

ह्या नंतर शॉर्ट लिस्ट केलेल्या तिन्ही बिल्डर्स चे फायनल सादरीकरण विशेष सर्व साधारण सभे पुढे करण्यात येईल ज्यात आपण एका बिल्डर चे नाव पक्के करू.

ह्या कामात सल्लागारांनी घेतलेले कष्ट, त्यांची तयारी आणि पारदर्शी सादरीकरण आपल्या सर्व सभासदांना भावले.

उपस्थित केलेल्या काही प्रश्नांची ही उत्तरं ही सल्लागारांनी आणि पंच समिती तर्फे देण्यात आली.

श्री सावंत आणि सचिव श्री पटवर्धन यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**पंच समिती**